SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

गुरुवार, दिनांक ११ जुन, २०२६

विनियम क्रमांक १०/२०२६

क्र.१०/२०२६ दिनांक : ११/०६/२०२६

विषय : विद्यार्थी विकास निधी विनियम क्रमांक १८/२०२२ दुरुस्ती विनियम २०२६.

ज्याअर्थी, उपरोक्त बाबीवर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेने विनियम क्रमांक १८/२०२२ विहित केले आहे,

आणि

ज्याअर्थी, विनियम क्र. १८/२०२२ मधील अनुक्रमांक ११(ii) (a,b)मधील तरतूदीनुसा**र विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती स्नातक (यु.जी) करिता रू.१५००/- व स्नातकोत्तर (पी.जी) करिता रू.२०००/-** अशी तरतुद आहे,

आणि

ज्याअर्थी, दि.२७.०२.२०२४ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेत विषय क्र.४९ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार, विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या विद्यार्थी विकास शिष्यवृत्तीच्या रक्कमेत रू.१५००/- वरून रू.१००००/- वाढ करण्याबाबत शिफारस करण्याकरिता विद्यार्थी विकास मंडळाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा असे ठरविण्यात आले,

आणि

ज्याअर्थी, दि. ०५.०८.२०२५. रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळ सभेत विषय क्र.४ अन्वये श्री कैलास चव्हाण, अधिसभा सदस्य यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती मध्ये स्नातक (यु.जी) करिता रू.१५००/- ऐवजी रू.२०००/-,तसेच स्नातकोत्तर (पी.जी) करिता रू.२०००/- ऐवजी रू.२५००/- अशी वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे,

आणि

ज्याअर्थी, दिनांक १५.१०.२०२५.रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळ सभेतील विषय क्र. ११७ अन्वये स्नातक (यु.जी.) करिता रू.१५००/-ऐवजी रू.२०००/- तसेच स्नातकोत्तर (पी.जी) करिता रू.२०००/-ऐवजी रू.२५००/- विद्यार्थी विकास शिष्यवृत्तीत वाढ करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेला करण्यात आली आहे,

आणि

ज्याअर्थी, दिनांक २०.११.२०२५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेत विषय क्र. १७३ अन्वये विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती, स्नातक (यु.जी) करिता रु.२५००/- तसेच स्नातकोत्तर (पी.जी) करिता रू.३०००/- अशी वाढ करण्यास व त्यानुसार विनियमात दुरूस्ती करण्यास मान्यता प्रदान केली आहे,

आणि

त्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३७ (१)(द) अंतर्गत अधिष्ठाता मंडळाने व कलम ३१ (न) नुसार व्यवस्थापन परिषदेने विद्यार्थी विकास शिष्यवृत्ती, स्नातक (यु.जी) करिता रु.२५००/- तसेच, स्नातकोत्तर (पी.जी) करिता रू.३०००/- अशी वाढ करण्यास विनियमात दुरुस्ती विहित केलेली आहे,

१. सदर विनियम हे ''**विद्यार्थी विकास निधी विनियम क्र. १८/२०२२ दुरुस्ती विनियम २०२६'' असे संबोधित करण्यात येईल.**

२. विनियम क्र.१८/२०२२ मधील अ.क्र.११ शिष्यवृत्ती यामधील (ii) (a,b) यामध्ये स्नातक (यु.जी) करिता रु २५००/- व स्नातकोत्तर (पी.जी.) करिता रू.३०००/- **अशी दुरूस्ती करण्यात येत आहे.**

३. सदर विनियम निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.